# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 27/01/2020 (सोमवार)
# (दुपार)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर हल्दीराम कंपनी गुमथळा येथे दिनांक 26/01/2020 चे 12.00 वा. दरम्यान अज्ञात कारचा चालक ओरापीने त्याच्या ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, परतात्मा एक सेवक कार्यक्रमात मौदा कडे जाणारी ट्रिपलसिट एमएच–49/झेड–3517 क्रमांकाची ॲक्टीव्हा गाडीला कट मारल्याने ॲक्टीव्हा गाडी स्लिप होवुन ते खाली पडले. या अपघातात फिर्यादींचा मित्र सोबती नामे– सुरज दशरथ मेश्राम, वय 23 वर्ष, रा. भांडेवाडी याच्या डोक्याला मार लागुन त्याचा जागीच मृत्यू झाला. तर सोबती फिर्यादींचा भाऊ मोहम्म्द हुसेन अन्सारी व आकाश शाहु हे दोघेही जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– इमतीहाज मोहम्मद हुसेन, वय 21 वर्ष, रा. प्लाट नं 09, भांडेवाडी, जय दुर्गा नगर पारडी, नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 177, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत माथनी येथे दिनांक 25/01/2020 चे 03.30 वा. दरम्यान कु. करीश्मा प्रभाकर वंजारी, वय 17 वर्ष, रा. माथनी हिने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. तिची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता प्राथमीक आरोग्य केंद्र, मौदा नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गंभा अनुसया प्रभाकर वंजारी, वय 39 वर्ष, रा. माथनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार कुथे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर